दैनिक
# महावृत्त
ई – मेल dainikmhavratt@gmail.com
संपादक : अशोक हनवते.मो.९४२१०९४९९१,७२६४०७९९९०

Bharat Chandak
SATYA ELECTRICALS
POLYCAB Roxcel legrand HAVELLS LAF SWITCHGEAR INDOASIAN
Finolex KOLORS USHA PHILIPS GreatWhite SIEMENS
Tapadia Market, Chain Sukh Road, Latur-413512
Ph :(O) 243678, 244458, 250776, (R) 242018
Email:satyaelectricals@rediffmail.com

लातूर वर्ष ३ रे अंक १०६ वा शुक्रवार दि.०८ सप्टेंबर २०२३ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.

## दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने तात्काळ विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवावे : खा.सुप्रिया सुळे

लातूर : राज्यातील दुष्काळ सदृश्य परिस्थिती , मराठा आर–क्षणासह महत्वपूर्ण प्रश्नांची सोडवणूक करण्याच्या उद्देशाने राज्य सरकारने तात्काळ विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोलवावे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या खा. सुप्रियाताई सुळे यांनी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना केली.
राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या ज्येष्ठ नेत्या खा. सुप्रियाताईल सुळे गुरुवारी सकाळी लातूर दौऱ्यावर आल्या होत्या. आपल्या या दौऱ्यात त्यांनी लातूरच्या पत्रकारांशी सुसंवाद साधला. पावसाने दडी मारल्याने आजघडीला राज्याच्या कानाकोपऱ्यात दुष्काळाचे भीषण सावट आहे. पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. जनावरांसाठी चारा छावण्या सुरु करणे गरजेचे आहे. राज्याच्या अनेक भागात ऐन पावसाळ्याच्या दिवसात टँकर सुरु करण्याइतपत पाणी टंचाई आहे. या तसेच मराठा आरक्षणामुळे उद्‌भवलेल्या पेचावर विचारविनिमय करून निर्णय घेण्यासाठी राज्य शासनाने तात्काळ विधिमंडळाचे विशेष अधिवेशन बोल–ावणे आवश्यक आहे. मराठा आरक्षणाच्या कारणावरून जालना जिल्ह्यात घडलेली आंदोलकांवरील लाठीमाराची घटना अतिशय निंदनीय आहे. त्या लाठीमाराच्या घटनेची जबाबदारी राज्याच्या गृहमंत्र्यांनी घेतली पाहिजे. एकंदर परिस्थितीवरून राज्यातील



कोणतेही काम धोरणात्मकदृष्ट्या राबवित नाही. त्यामुळे या सरकारला धोरण पक्षाघात झाल्याचा घणाघाती आरोपही खा. सुळे यांनी केला.
राज्यावर यावर्षी पावसाची अवकृपा झाल्याने पाणीटंचाई सोबतच जमिनीतील पाणी पातळीही मोठ्या प्रमाणावर घटण्याची शक्यता निर्माण झाली आहे. ही बाब सुद्धा अतिशय चिंतनिय आहे, असे सांगून खा. सुप्रियाताई सुळे पुढे म्हणाल्या की, राज्य सरकार नको त्या कामात व्यस्त असल्याचे दिसून येते. शासन आपल्या दारी या उपक्रमाऐवजी आइस अर्थात इन्कम टॅक्स, सीबीआय, इडी आल्या दारी हा प्रकार अधिक गतीने राबविला जात आहे ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. मराठा आरक्षणासोबतच अनेक वर्षांपासूनची आरक्षणाची मागणी असणाऱ्या धनगर, लिंगायत, मुस्लिम समाजालाही राज्य सरकारने आरक्षण द्यायला हवे असे त्या म्हणाल्या. केंद्र सरकारने बोलावलेल्या संसदेच्या विशेष अधिवेशनाचा कोणताही अजेंडा दिलेला नाही. या अधिवेशनात प्रश्नोत्तराचा तास ठेवण्यात आलेला नाही. त्यावरून एकंदर केंद्र सरकारची भूमिकाही दडपशाहीची असल्याचे दिसून येत असल्याचे त्या म्हणाल्या. विरोधी पक्षांनी एकत्रित येऊन आपल्या आघाडीचे नाव इंडिया ठेवल्याने केंद्र सरकार इंडियाचे नामकरण भारत करत असल्याचा आरोपही सुळे यांनी केला.
याप्रसंगीआ.संदीप क्षिरसागर, शहर जिल्हाध्यक्ष राजा मणियार, बस्वराज पाटील नागराळकर, प्रदेश सरचिटणीस संजय शेटे, लातूर जिल्हा निरिक्षक डॉ.नरेंद्र काळे,बबन गिते,युवक प्रदेशाध्यक्ष महेबुब शेख,चंदन पाटील नागराळकर,प्रशांत घार सर,भरत सुर्यवंशी,डी.उमाकांत,सोमेश्वर कदम,बक्तावर बागवान,निशांत वाघमारे,रेखाताई कदम, मनिषा कोकणे,इर्शाद तांबोळी,छायाताई चिंदे,चंद्रशेखर कत्ते,आदर्श उपाध्ये, गंगापुरे सर,मुन्ना तळेकर,विशाल देवकते,विनायक बगदुरे,समीर शेख,प्रदीप पाटील,जाकीर तांबोळी,मदन आबा काळे,परमेश्वर पवार,प्रा.सुधीर साळूंके, डॉ.बापुसाहेब पाटील, कल्याणराव बरगे,रशीद शेख, आत्माराम साळूंके,नरेंद्र पाटील, शिवाजी मुळे,निखिल मोरे,प्रविण साळूंके,खंडू लोंढे यांच्या सह अनेक पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## एफआयआरला विलंब झाल्यास पुरावे तपासा

नवी दिल्ली : ‘एखाद्या प्रकरणामध्ये एफआयआर दाखल करण्यास विलंब झाला असेल आणि तपास यंत्रणेला योग्य स्पष्टीकरण सादर करता आले नसेल तर न्यायालयांनी काळजीपूर्वक पुरावे तपासून पाहायला हवेत. अशा स्थितीमध्ये न्यायालयाने सुरक्षा रक्षकाची भूमिका पार पाडायला हवी. सरकारी पक्षाकडून काही बाबी अवाजवी फुगवून तर सांगितल्या जात नाहीत ना, हे पडताळून पाहायला हवे. असे स्पष्ट मत सर्वोच्च न्यायालयाने आज मांडले.
न्यायालयाने आज एका खून प्रकरणात दोषी ठरविण्यात आलेल्या आणि नंतर जन्मठेपेची शिक्षा ठोठावण्यात आलेल्या दोन कैद्यांची निर्दोष मुक्तता केली. या दोघांनाही १९८९ मध्ये दोषी ठरविण्यात आले होते. त्यावर छत्तीसगड उच्च न्यायालयाने शिक्कामोर्तब केले होते. न्या. जे. बी. पारडीवाला आणि न्या. मनोज मिश्रा यांच्या खंडपीठासमोर या प्रकरणी सुनावणी पार पडली. या दोन्ही आरोपींवर खून प्रकरणी २५ ऑगस्ट १९८९ रोजी खटला चालविण्यात आला होता.



प्रत्यक्षात याच प्रकरणात एफआयआर दुसऱ्या दिवशी विलासपूर जिल्ह्यात दाखल करण्यात आला होता. सर्वोच्च न्यायालयाने याची गंभीर नोंद घेतली. न्यायालयाने या प्रकरणी ५ सप्टेंबर रोजी झालेल्या सुनावणीदरम्यान उपरोक्त निरीक्षण नोंदविले होते.

**असा आहे खटला**

हरिलाल आणि परसराम यांनी उच्च न्यायालयाने ‘फेब्रुवारी– २०१०’ मध्ये दिलेल्या निकालाला सर्वोच्च न्यायालयात आव्हान दिले होते. तत्पूर्वी उच्च न्यायालयाने कनिष्ठ न्यायालयाने याच प्रकरणात १९९१ मध्ये दिलेल्या आदेशांवर शिक्कामोर्तब केले होते. कनिष्ठ न्यायालयाने या दोन्ही आरोपींना दोषी ठरवितानाच आजन्म कारावासाची शिक्षा ठोठावली होती.

**साक्षीदारांच्या विश्वासार्हतेवर प्रश्नचिन्ह**

या प्रकरणाच्या तपासादरम्यान खुनाचे विशेष असे कारण समोर आलेले नाही. तसेच अनेक महत्त्वाच्या घटकांची चौकशी झालेली नाही. जे या प्रकरणामध्ये मुख्य साक्षीदार होते त्यांनी देखील अनेकवेळा साक्ष बदलली आहे. त्यामुळेच साक्षीदारांच्या विश्वासार्हतेवर देखील प्रश्नचिन्ह निर्माण होते. या प्रकरणाच्या तपासादरम्यान एफआयआर दाखल करण्यास देखील विलंब झाल्याचे दिसते, असे सर्वोच्च न्यायालयाने नमूद केले.

## ना. संजय बनसोडे यांनी जाणून घेतल्या नागरिकांच्या समस्या; तातडीने कार्यवाही करण्याच्या संबंधित विभागांना सूचना

लातूर, दि. ७ (जिमाका) : क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी उदगीर शासकीय विश्रामगृह येथे तालुक्याच्या विविध भागातून आलेल्या नागरिकांशी संवाद साधत त्यांच्या समस्या जाणून घेतल्या. तसेच याठीकणी उपस्थित संबंधित अधिकाऱ्यांना या अनुषंगाने तातडीने कार्यवाही करून समस्यांचा निपटारा करण्याच्या सूचना ना. बनसोडे यांनी दिल्या.



माजी आमदार गोविंदराव केंद्रे, तहसीलदार रामेश्वर गोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप भागवत, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, उपविभागीय कृषि अधिकारी एन. आर. काळे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार, महावितरणचे उप कार्यकारी अभियंता सायस दराडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एल. डी. देवकर, ग्रामीणचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार, शहर पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.
यावेळी नागरिकांनी प्रामुख्याने ग्रामीण भागा–तील रस्ते, पाणी पुरवठ्याच्या समस्या, महावितरणशी संबंधित समस्या, शहर व गा–वातील अंतर्गत रस्ते, वैद्यकीय मदत आदी विषयाच्या समस्या, निवेदने सादर केली. ना. बनसोडे यांनी प्रत्येकाशी संवाद साधून त्यांची समस्या जाणून घेतल्या. तसेच या समस्या तातडीने सोडविण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

## तळणी - कारेपूर रोडवरील पुलाचे आ रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते लोकार्पण

लातूर – रेणापूर तालुक्यातील तळणी – कारेपूर रोडवर असलेल्या नदीवर बांधण्यात आलेल्या सव्वा कोटी रुपये खर्चाच्या पुलाचे भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते ६ सप्टेंबर २०२३ रोजी लोकार्पण करण्यात आले.



यावेळी भाजपाचे विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे तालुका अध्यक्ष अँड दशरथ सरवदे, संगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे भाजपाचे महेंद्र गोडभरले रमाकांत फुलारी सुरेश बुड्डे सार्वजनिक बांधकाम विभागाचे शाखा अभियंता सोनवणे आदीची प्रमुख उपस्थिती होती.
सदरील नदीवर पूल नसल्याने सर्वसामान्य नागरिकासह वाहनधारकांना सातत्याने त्रास सहन करावा लागत होता. सदरचा पूल झाल्याने या रस्त्यावरून जाणाऱ्या अनेकांची मोठी गैरसोय दूर झाली आहे. आ रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते पुलाचे लोकार्पण झाल्याने या भागातील नागरिकात आनंदाचे आणि समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून या कार्यक्रमास विकास सोसायटी तळणीचे चेअरमन ज्ञानोबा आरदवाड, हनुमंत उगिले, शिवाजीराव बोंबडे, दिलीप येलाले, सिद्धेश्वर मामडगे, अजय बोंबडे, बालाजी बरुरे, विलास येलाले, धोंडीराम ठोंबरे, ओमकारअपा क्षीरसागर, अंगद कापसे, राजेश काळे, ओमकार पल्ले ओम चव्हाण यांच्यासह त्या परिसरातील नागरिक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते

## टोईंग वाहनावरील महिला कर्मचाऱ्यास मारहाण; गुन्हा दाखल वाहतुकीचे नियम पाळण्याचे मनपाचे आवाहन

लातूर/प्रतिनिधी:टोइंग वाहनावरील महिला कर्मचाऱ्यास शिवीगाळ व मारहाण प्रकरणी पोलिसात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शहरातील नागरिकांनी असे प्रकार टाळावेत. वाहतुकीचे नियम पाळावेत,असे आवाहन मनपा आयुक्तांनी केले आहे.
लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने विश्व एंटरप्राइजेस यांना वाहतूक सुरळीत होण्याच्या दृष्टीने काम देण्यात आलेले आहे.नो पार्किंग झोनमध्ये उभ्या वाहनांना जामर लावणे,दंड वसूल करणे अशी कामे ही एजन्सी करते.बुधवारी (दि.६ सप्टेंबर) सायंकाळी सुभाष चौकात एका व्यक्तीने नो पार्किंग झोन मध्ये दुचाकी लावली. एजन्सीच्या कर्मचाऱ्यांनी या दुचाकीस जामर लावले.त्यावेळी संबंधित अनोळखी व्यक्ती व दोन महिलांनी एजन्सीच्या कर्मचारी बालिका कांबळे यांना अर्वाच्य भाषेत शिवीगाळ तसेच मारहाणही केली.यात त्यांच्या हाताला दुखापत झाली आहे. कांबळे यांनी यासंदर्भात गांधी चौक पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केल्यावरून अनोळखी व्यक्तींच्या विरोधात खझउ कलम ३२५, २९४, ३२३, ५०४, ५०९ व ३४ नुसार गुन्हा आला आहे.
शहरातील वाहतूक सुरळीत करून नागरिकांचा



त्रास कमी करण्यासाठी मनपा व वाहतूक पोलिसांच्या वतीने विविध उपाय योजना केल्या जात आहेत. नागरिकांनी वाहतुकीचे नियम पाळून मनपास सहकार्य करावे, असे आवाहन आयुक्तांच्या वतीने करण्यात आले आहे.
वेगाने विकसित होणाऱ्या लातूर शहरात वाहनांची संख्या मोठी आहे.वाहनधारक सार्वजनिक ठिकाणी व बाजारपेठेत आल्यानंतर पार्किंगची समस्या निर्माण होते.त्यावर तोडगा काढण्यासाठी मनपाने पार्किंगसाठी ठिकाणे निश्चित केली आहेत. नागरिकांनी तेथेच आपली वाहने पार्क करावीत. वाहतूक सुरळीत रहावी, यासाठी मुख्य रस्त्यावर पिवळे पट्टे मारण्यात आले आहेत.या पिवळ्या पट्ट्याच्या आतील बाजूस नागरिकांनी वाहन सोडणे आवश्यक आहे.पिवळ्या पट्ट्याच्या बाहेर वाहन सोडून वाहतुकीस अडथळा केला तर संबंधित वाहनास जामर लावून दंड आकारला जातो.नागरिकांनी आपली वाहने ठरवून दिलेल्या ठिकाणी,पिवळ्या पट्ट्याच्या आतील बाजूसच पार्क करावीत. वाहतुकीस अडथळा होईल अशा ठिकाणी आपली वाहने उभी करू नयेत.
सध्या सणासुदीचे दिवस आहेत.त्यामुळे बाजारपेठेत मोठी गर्दी आहे.अशा स्थितीत वाह–तूक सुरळीत राहण्यासाठी नागरिकांनी सहकार्य करावे.दंडात्मक कारवाई होणार नाही याची दक्षता घ्यावी,असे आवाहन मनपा आयुक्त बाबासाहेब मनोहरे यांनी केले आहे.

## संपादकीय....

# मेरे देश की धरती..

काहींच्या डोळ्यांवरचा 'इंडिया'चा चष्मा राष्ट्रपतींनीच काढून फेकल्यामुळे आपण आता 'भारत'कडे उघड्या डोळ्यांनी पाहात प्रगतीची नवनवी शिखरे गाठणार आहोत..

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी स्वतःस 'प्रेसिडेंट ऑफ इंडिया'ऐवजी 'प्रेसिडेंट ऑफ भारत' असे संबोधण्यास सुरुवात केल्याने बाकी कोणास नाही तरी महान अभिनेते मनोजकुमार, जनरल सॉ माँग आणि रिसेप तय्यीप एर्दोगान या महानुभावांस निश्चितच आनंद होईल. चित्रपटात आदर्श, सज्जन, स्वप्नवादी अशा व्यक्तिरेखेसाठी 'भारत' हे नाव मनोजकुमार यांस योग्य वाटले. तेव्हापासून भारत याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. अशा तऱ्हेने चांगुलपणाची ओळख भारत या नावाने करून देण्यास त्यांनी सुरुवात केली. आपल्या राष्ट्रपतींनी आणि अर्थातच केंद्र सरकारातील अनेकांनी लहानपणी मनोजकुमार यांचे चित्रपट मोठ्या प्रमाणावर पाहिले असणार. त्याशिवाय का ते इतके संस्कारी झाले? त्यामुळेच तेव्हापासून या मंडळींच्या डोक्यात इंडियाचे नाव भारत असे असावे असे घोळत असणार. खरे तर या सर्वांनी राज कपूर यांचे चित्रपट पाहिले असते तर त्या सर्वास हा 'भारत'चा टप्पा ओलांडून थेट 'हिंदुस्थान'वर उडी घेता आली असती. तसे करायचे तर कदाचित मध्ये 'मैली गंगा' ओलांडावी लागली असती. म्हणून ते टाळले असेल. असो. मनोजकुमार यांच्याखेरीज सॉ माँग आणि एर्दोगान हेही या नामांतराने आनंदित होतील. कारण या दोन महानुभावांनी आपापल्या देशांचे असेच नामांतर केले. आर्थिक आघाडीवरील अनेक आव्हानांनी त्रासलेल्या ब्रह्मदेशाचे नामांतर माँग यांनी म्यानमार असे केले आणि भयानक चलनवाढ, गर्तेत गेलेले देशी चलन, बिकट अर्थव्यवस्था आदींनी जर्जर झालेल्या टर्कीस एर्दोगान यांनी टर्कीये असे नाव दिले. तेव्हापासून या देशांस ऊर्जितावस्था आली. इंडियास आता 'भारत'चे देशी टोपडे चढवण्याच्या महान निर्णयामुळे आपणही आता माँग आणि एर्दोगान यांच्या मांडीला मांडी लावून बसू शकतो. 'इंडिया'स असे 'भारत' केले नसते तर हा मान मिळाला नसता. आपले हे नामांतर झाल्याने अमेरिकादी पाश्चात्त्य देशांस बधिरत्व येण्याची शक्यता आहे. कारण ब्रह्मदेशचे म्यानमार, टर्कीचे टर्कीये आणि इंडियाचे भारत झाल्याने अनेक पाश्चात्त्य देशांतील नागरिक आपणही प्रगतीचा हाच मार्ग चोखाळावा, अशी मागणी करू लागले आहेत. परिणामी 'जी २०' परिषदेस येणारे एकापेक्षा एक बडे नेते आपल्या प्रगतीने थक्क होऊन आपापल्या मायदेशी परतायलाच नको असे म्हणण्याची शक्यता आहे. या बड्या देशांतील राजकारण्यांस, जे की बायडेन, सुनक वगैरे नावांनी आ-ओळखले जातात ते, त्यांच्यासमवेत येणारे उद्योगपतींस, व्यावसायिकांस 'भारत' देशाचे नागरिकत्व देण्यासाठी आपले परराष्ट्रमंत्री जयशंकर यांच्या अध्यक्षतेखाली एक खास कक्षही 'जी२०' परिषद मंडपात उभारला जाणार आहे. हे असे काही होणार याचीच कुणकुण लागल्याने चीनचे क्षी जिनपिंग आणि रशियाचे व्लादिमिर पुतिन यांनी 'भारता'त येण्याचे टाळले, असे कळते. या आपल्या 'भारतीकरणा'मुळे वर्षानुवर्षे ड्वाईशलँड असूनही जर्मनी वा निप्पॉन असा उल्लेख असूनही जपान असे म्हणवून घेणाऱ्या देशांतही नागरिकांच्या भावनेचा उद्रेक झाला असून आपलेही नामकरण करा, यासाठी त्या देशांतील नागरिकांनी भोकाड पसरल्याची माहिती सूत्रांकडून मिळते. हे झाले परदेशातील वर्तमान. आता देशाविषयी.

इंडियास आता 'भारत' करण्याच्या अतिशय दूरगामी, विचारी आणि द्रष्ट्या निर्णयामुळे लवकरच आता सर्वोच्च न्यायालयास 'सुप्रीम कोर्ट ऑफ भारत', 'आयआयटी'स 'भारत इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी', 'बीसीसीआय'ला 'बोर्ड ऑफ क्रिकेट कंट्रोल ऑफ भारत', 'इस्रो'स 'भारत स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन' या नव्या नावांनी ओळखले जाईल. याच्या जोडीने अन्य काही संस्थांचेदेखील नामकरण नव्याने केले जाईल. जसे की 'भारतीय तेल' हे 'इंडियन ऑइल'साठी नवे नाव असेल तर 'हवाई भारत' हे नाव यापुढे 'एअर इंडिया'स दिले जाईल तर 'कोल इंडिया' ही सरकारी मालकीची कंपनी लवकरच 'कोळसा भारत' असे नवे नाव लावेल. त्याचप्रमाणे 'सेबी'च्या नावातील 'आय'च्या जागी आता 'बी' येईल. अशा तऱ्हेने ही यादी वाचकही आपापल्या कल्पनाविस्तारामुळे हवी तितकी वाढवू शकतात. त्या सगळ्याचा अर्थ तोच असेल. यापुढे 'इंडिया' बंद. फक्त 'भारत'. आपणास अलीकडच्या काळात या नव्या भारतात काय काय, कशी कशी प्रगती सुरू आहे याचे दाखले वारंवार दिले जात होतेच. पण हे अनेकांस दिसत नव्हते. याचे कारण त्यांच्या डोळ्यांवरचा तो 'इंडिया'चा चष्मा. आता आपल्या दयाळू राष्ट्रपतींनीच तो काढून फेकल्यामुळे आपणास 'भारता'कडे उघड्या डोळ्यांनी पाहावेच लागेल. तसे पाहण्यास सुरुवात केल्यामुळे आपण प्रगतीचे नवनवे शिखर गाठत राहणार आहोत.

जसे की 'इंडिया' म्हटल्यामुळे आर्थिक आव्हाने जाणवत होती; ती 'भारता'त गायब होतील. कारण 'इंडिया' म्हणून तुलना व्हायची ती अमेरिकादी असंस्कारी, दुराचारी अशा पाश्चात्त्य देशांशी. यापुढे तसे होणार नाही. कारण आपण आता 'भारत' असू. त्यामुळे आपली बरोबरी होईल ती अशीच आत्मसन्मानयुक्त देशी नावे असलेल्या म्यानमार, श्रीलंका, तुर्कीये यांच्याशी. पाश्चात्त्य देशांचे नावच आता निघणार नाही. त्यामुळे त्यांच्याशी स्पर्धा करण्याचा प्रश्नच यापुढे उद्भवणार नाही. एकदा का आपण 'भारत' म्हणून त्या देशांच्या स्पर्धेत नाही हे समस्त 'इंडिया'च्या नागरिकांस कळले की आपली त्यांच्याशी तुलना होण्याचा प्रश्नच नाही. म्हणजे आपण किती मागे आहोत हे कोणास कळण्याचीही शक्यता नाही. म्हणजेच झाली की आपली प्रगती! तीच बाब रस्ते, आरोग्य वगैरेंच्या बाबत. म्हणजे भारत म्हणून आपले रस्ते प्राचीनकालीन, सिंधुसंस्कृतीकालीन भूप्रदेशापेक्षा नक्कीच बरे असतील.

# भटक्यांच्या पालावर कधी पोहोचणार लोकशाही?

भटक्या-विमुक्त समाजातील मुलांना शाळेतही साधा प्रवेश मिळत नाही. असा समाज विकासाची स्वप्नं कधी पाहणार आणि कशी? जवळपास २० कोटी लोकसंख्या असणारा भटका-विमुक्त समाज आजही भारतीय समाजातील एक अदृश्य घटक आहे. हा समाज आपल्या देशात वावरतो, देशाच्या विकासात आपली भूमिका बजावतोय याची जाणीव तरी आपल्याला आहे का? कित्येक शतकांपासून भटकंती करत आपलं पोट भरणाऱ्या या समाजाला आपण भटक्या जमाती म्हणतो. ३१ ऑगस्ट १९५२ ला गुन्हेगारी जमाती कायदा रद्द झाला आणि अशा २०० जमाती या कायद्यातून मुक्त झाल्या. तोच दिवस विमुक्त दिवस म्हणून ओळखला जातो. तेव्हा आश्वासन देण्यात आलं होतं की या कायद्यात सूचिबद्ध २०० पेक्षा जास्त जमातींवर जन्मजात गुन्हेगारीचा लादलेला शिक्का पुसला जाईल, परंतु प्रत्यक्षात ते झालेलं दिसत नाही. विकासाच्या प्रवाहात क्वचितच हा समाज बघायला मिळतो. आजही हा समाज अन्न, वस्त्र, निवाऱ्यासाठी वणवण भटकतोय. आरोग्य आणि शिक्षण या मूलभूत गरजा तर त्याच्यापासून कोसो दूरच आहेत.

गुन्हेगारी जमाती कायदा रद्द झाला त्यापाठोपाठ वेगवेगळ्या राज्यांनी हॅबिच्युअल ऑफेंडर्स (करलर्ळीरश्र जषषशपवशीी) नावाने कायदे बनवायला सुरुवात केली. हे कायदे गुन्हेगारी जमाती कायद्यासारखेच होते. फक्त त्यातून जमाती हा शब्द वगळण्यात आला होता. अजूनही बहुतेक राज्यांमध्ये हे कायदे लागू आहेत. कोणतीही व्यक्ती दोषी ठरत नाही तोवर तिला निर्दोष समजणं, हा कुठल्याही फौजदारी न्यायशास्त्राचा गाभा आहे, पण हे कायदे या तत्त्वाच्या परस्परविरोधी आहेत. जून महिन्यात वारीच्या काळात आळंदी पोलिसांनी चोरी करू शकतील या संशयावरून १५० पारधी लोकांना पकडून दोन दिवस बंदिस्त ठेवले होते, त्यात लहान मुलं, गरोदर महिला यांचा समावेश होता. हे अनुच्छेद १४ आणि २१ मधील मूलभूत हक्कांचं उल्लंघन होतं.



अमेरिकेतले सेंट्रल पार्क फाइव्ह हे प्रकरण प्रसिद्ध आहे. १९८९ मध्ये बलात्काराच्या एका प्रकरणात पोलिसांना गुन्हेगाराचा शोध लागत नव्हता, तेव्हा त्यांनी सहा कृष्णवर्णीय अल्पवयीन मुलांना पकडून गुन्हा कबूल करायला भाग पाडलं आणि ते आरोपी असल्याचं जाहीर केलं. फक्त कृष्णवर्णीयांनीच नाही तर अपराधगंडातून काही श्वेतवर्णीयांनीही या संदर्भात वर्णभेदाच्या विरोधात रस्त्यावर उतरून आंदोलनं केली. २००२ मध्ये खरा गुन्हेगार सापडला आणि त्या मुलांना सोडून देण्यात आलं. या घटनेने पूर्ण अमेरिकन न्यायप्रणाली ढवळून निघाली आणि कायद्यांमध्ये मूलभूत सुधारणा व्हायला सुरुवात झाली. जगभर या घटनेचा निषेध झाला. त्यावर संशोधन झालं, चित्रपट बनवले गेले. २००३ मध्ये अशीच एक घटना भारतात घडली. नाशिकमध्ये बलात्कार करून, पाच जणांचा खून करून आणि दरोडा टाकून दरोडेखोर फरार झाले. पोलिसांना खरे गुन्हेगार सापडत नव्हते. मग त्यांनी सहा पारध्यांना पकडलं. त्यापैकी एक जण अल्पवयीन होता. फारसे पुरावे नसतानाही न्यायालयात गुन्हा सिद्ध झाला आणि त्यांना फाशीची शिक्षा झाली. २०१८ मध्ये सर्वोच्च न्यायालयात पुनर्विचार याचिका दाखल करण्यात आली तेव्हा त्यांना चुकीच्या पद्धतीने अडकवलं गेलं आहे हे सिद्ध झालं. २०१९ मध्ये त्यांना निर्दोष मुक्त करण्यात आलं. शोकांतिका अशी की हे प्रकरण चर्चेत तर आलंच नाही, माध्यमांमध्येही त्याला जेमतेम जागा मिळाली. संबंधित पोलिसांवर कोणतीच कारवाई झाली नाही. या लोकांना चुकीच्या पद्धतीने तर फसवण्यात आलं नाही ना, हा प्रश्नही न्यायव्यवस्थेला पडला नाही. एकीकडे अशाच प्रकरणामुळे पूर्ण अमेरिका पेटून उठते, तर दुसरीकडे भारतात तसंच प्रकरण घडून कुणाच्या लक्षातही येत नाही. स्वतःला तारणहार समजणारा इथला उच्चवर्णीय समाज अशा मूलभूत गोष्टींसाठी सोयीस्करपणे आंधळा आहे. हे मूलभूत प्रश्न जिवंत ठेवण्यासाठी हजारो वर्षांपासून इथली विषमतावादी व्यवस्था पूरक ठरली आहे.

निर्णयप्रक्रियेच्या कुठल्याच क्षेत्रात भटक्या-विमुक्त समाजाचं नेतृत्व अजिबात दिसत नाही. याचं कारण या समाजाबद्दलचे पूर्वग्रह. बंजाऱ्याने चोरी केली, पारध्याने घर फोडलं, वडाराने पाकीट मारलं अशा बातम्या बघायला मिळतात. दुसरीकडे विजय मल्ल्याची जात मात्र कुठल्याच बातमीत दिसत नाही. या समाजाचा मानववंशशास्त्र, आर्थिक आणि सामाजिक शास्त्रीय दृष्टिकोनातून अभ्यास व्हायला पाहिजे होता, पण तो गुन्हेगारीच्या पूर्वग्रहाच्या दृष्टिकोनातून जास्त झालेला बघायला मिळतो. शासकीय धोरण, राजकारण, ज्ञाननिर्मिती, माध्यमं, न्यायव्यवस्था अन् पोलीस प्रशासन अशा क्षेत्रात जोपर्यंत या समाजाला प्रतिनिधित्व मिळत नाही तोपर्यंत या गोष्टी याच दृष्टिकोनातून बघितल्या जातील, मांडल्या जातील.

सामाजिक मागासलेपणाला शैक्षणिक मागासलेपण जबाबदार असतं. भटक्या-विमुक्तांच्या शिक्षणाचा मुद्दा खूप बिकट आहे. विजय कोरा यांनी आंध्र प्रदेशात केलेला स्वतंत्र अभ्यास चिंताजनक परिस्थिती दर्शवितो, भटक्या आणि विमुक्त समाजातील फक्त ०.८ टक्के विद्यार्थी बारावीपर्यंत पोहोचू शकले. मध्य प्रदेश, राजस्थान आणि गुजरात राज्यांत भाषा संशोधन केंद्रानं २०१९-२१ मध्ये केलेल्या संशोधन अहवालानुसार, गडिया लोहार समाजातील ६-१८ वयोगटातील ६५.६ टक्के मुलांची शाळेत नावनोंदणीच झाली नाही. हा आकडा असर २०२२ अहवालाने दर्शविलेल्या राष्ट्रीय आकडयापेक्षा जवळपास २१ पटीने जास्त आहे. एकीकडे आपल्या शैक्षणिक धोरणात उच्च शिक्षणाचा दर ५० टक्क्यांपर्यंत पोहोचायचा उद्देश आहे, तर दुसरीकडे बहुतांश भटक्या-विमुक्त समाजात माध्यमिक शिक्षण घेणाऱ्यांची संख्या एक टक्क्याच्या आसपास आहे.

यामागे दोन कारणं फार महत्त्वाची आहेत, भटक्या-विमुक्तांमध्ये असणारा कागदपत्रांचा अभाव. महाराष्ट्रात ४२ भटक्या-विमुक्त जाती या गावातून त्या गावात उदरनिर्वाहासाठी स्थलांतरित होत राहतात. मग त्या १९६१ च्या आधीचा पुरावा कसा सादर करणार? तो केला नाही तर जातीचा दाखला मिळत नाही. रेणके आयोगाच्या अहवालानुसार ६१.८ टक्के भटक्या जमातीच्या लोकांकडे जातीचे प्रमाणपत्र नव्हते. भाषा अकादमीने केलेल्या संशोधनानुसार भटके-विमुक्त समुदायातील फक्त १७.३२ टक्के मुलं आरक्षणाचा फायदा घेऊ शकतात. राजस्थानमध्ये २०२० मध्ये ओळखपत्र आणि रहिवासी पुरावा नसल्यामुळे गडीया-लोहार समाजातील मुलाला मुख्याध्यापकांनी शाळेत प्रवेश नाकारला. अशी किती मुलं शिक्षणाला मुकली असतील? रेणके आयोगानुसार ७७.७ टक्के भटक्या समाजातील मुलं शाळेत जात नव्हती. आधीच अठरापगड दारिद्र्य, वरून आता एन.आर.सी.ची टांगती तलवार. साधा शाळेत प्रवेश मिळत नाही तर शेकडो वर्षांपासून इथे असलेला भटका-विमुक्त समाज नागरिकत्व कसं सिद्ध करणार?

दुसरे कारण म्हणजे यांच्याबाबत होणारा सामाजिक भेदभाव. भाषा अकादमीच्या संशोधनानुसार ७१.५ टक्के पारधी मुलांसोबत एकाच भांड्यातून पिण्याच्या पाण्यावरून भेदभाव होतो. १९२७ मध्ये बाबासाहेबांनी महाडला पाण्यासाठी सत्याग्रह केला, पण तो संघर्ष अजूनही संपलेला दिसत नाही. ८५ टक्के पारधी मुलांना जातीवरून अपमानित केलं जातं. या गुन्हेगारीच्या शिक्क्याने लहान मुलांनासुद्धा सोडलेलं नाही. आजही या मुलांना चोराच्या औलादी म्हणून संबोधलं जातं. आपण काही तरी वेगळे आहोत ही जाणीव त्यांच्यात निर्माण केली जाते. शाळा आपल्यासाठी नसतेच, या भावनेने किती तरी मुलं शाळा सोडून देतात.

असं सगळं असताना भटक्या-विमुक्तांसाठी केंद्र सरकारने २०० कोटींच्या एकूण बजेटसह सीड (डएएऊ) नावाची योजना पाच वर्षांसाठी आणली. त्यात वार्षिक ४० कोटी रुपये खर्च करणं अपेक्षित आहे. पण भटक्या-विमुक्तांची एकूण लोकसंख्या पाहता त्यातून प्रत्येकी तीन रुपयेही मिळत नाहीत, यावरून आपल्या धोरणकर्त्यांची 'प्रगल्भ' दृष्टी समोर येते. जखमेवर मीठ चोळणे यालाच म्हणता येईल?

इदाते आयोगानुसार आजही २६९ भटक्या-विमुक्त जमाती, अनुसूचित जाती, जमाती आणि इतर मागासवर्गीयांमध्ये (डउ/ डढ/ जइउ) सूचिबद्ध करण्यात आलेल्या नाहीयेत, त्यामुळे ते आरक्षण आणि शासकीय योजनांचा लाभ घेऊ शकलेले नाहीयेत. त्यांची आकडेवारी आणखी चिंताजनक आहे. समाज आणि शासनाकडून मिळणाऱ्या उपेक्षेमुळे आधुनिकतेच्या रेट्यात पारंपरिकतेने जगणारा हा समाज पूर्णपणे ठेचला गेला आहे. करोनाच्या काळात घर ना दार, ना पोटाला भाकर अशा अवस्थेत या समाजाने दिवस काढले. १९९१ च्या खाउजा धोरणाचा सगळ्यात जास्त फटका भटके-विमुक्त समुदायाला बसला आहे. वेगवेगळे वन कायदे, वन्यजीव संरक्षण, प्राणी क्रूरता, भिक्षा प्रतिबंध, गुन्हेगारी कायदे अशा वेगवेगळ्या कायद्यांनी भटक्या-विमुक्तांचे जीवन विस्कळीत करून ठेवले आहे. दिवसेंदिवस ही परिस्थिती अजून बिकट होत आहे.

धम्मसंगिनी यांची एक कविता आहे, 'देस देस कसला? त्यो, मिळू दे मलाही, पारध्याच्या पालावर ये गं लोकशाही'. लोकशाहीला भटक्या-विमुक्तांचा पत्ता अजूनही सापडलेला दिसत नाही. तो तिला लौकर सापडेल अशी आशा आहे.

# चक दे इंडिया

जागतिक ॲथलेटिक्समध्ये ऑलिम्पिकचा कित्ता पुन्हा गिरवत नीरज चोप्राने सुवर्णपदक जिंकले आणि अशी किमया करणारा तो पहिला भारतीय खेळाडू ठरला आहे. त्याचवेळी आनंदच्या यशाने देशाच्या बुद्धिबळाचा चेहरा बदलला आहे.

काही दिवसांपूर्वीच्या जागतिक बुद्धिबळ स्पर्धेत प्रज्ञानंदने अंतिम सामन्यापर्यंत धडक मारली. तसेच गुकेश आणि इरगेसी हे उपउपान्त्यपूर्व फेरी गाठण्यात यशस्वी ठरले. भारतात क्रीडाकौशल्याची वानवा नाही; मात्र त्यांना योग्य संधी आणि प्रशिक्षण न मिळाल्यामुळे त्यांची चमक जगासमोर आली नाही; पण आता काळ बदलत असून क्रीडाविश्वातही भारत जगभरात आगेकूच करत आहे.

रतात हॉकीचे जादूगार मेजर ध्यानचंद यांनी हॉकीत इतिहास घडविल्यानंतर कालांतराने या खेळात भारतीय संघ रसातळाला पोचला. मात्र आता पुन्हा नव्याने उभारी घेत आपली ओळख मजबूत करण्याच्या दृष्टीने वाटचाल करत आहे. २०२०च्या टोकिओ ऑलिम्पिकमध्ये जिंकलेले कांस्यपदक याच भावनेचे द्योतक आहे. भारताने ४१ वर्षांच्या खंडानंतर हॉकीत पदक जिंकले होते. भारतीय खेळाडूंच्या गेल्या दीड आणि दोन दशकांच्या कामगिरीवर लक्ष दिले तर देशाला ॲथलेटिक्स, मुष्टियुद्ध, कुस्ती, बुद्धिबळ, नेमबाजीसारख्या खेळात यश मिळत आहे. या यशाने भारतीयांच्या आशा पल्लवित झाल्या आहेत. भारताने पुन्हा एकदा हॉकीबरोबर अन्य खेळात सुवर्णकाळ गाजवावा, अशी मनोमन इच्छा चाहते बाळगून आहेत.

काही दिवसांपूर्वी बॅडमिंटनपटू एच. एस. प्रणॉयने जागतिक बॅडमिंटन चॅम्पियनशिपमध्ये कांस्यपदक जिंकले. गेल्या वर्षी पी. व्ही. सिंधू, सायना नेहवाल, लक्ष्य सेन यांसारख्या खेळाडूंनी बॅडमिंटन खेळात दबदबा निर्माण केला आणि पदकांची लयलूटही करत आहेत. नेमबाज देखील आंतरराष्ट्रीय पातळीवर चमकदार कामगिरी करत आहेत. बाकू येथील आयएसएसएफ जागतिक चॅम्पियनशिपमध्ये भारताने सहा सुवर्णपदकांसह चौदा पदकांवर नाव कोरले. याच रीतीने बुद्धिबळ, कुस्ती, बॉक्सिंग, नेमबाजीतही भारतीय खेळाडूंचा बोलबाला दिसत आहे. मात्र आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत यश मिळवणारे भारतीय खेळाडू ऑलिम्पिकसारख्या मोठ्या स्पर्धेत हाराकिरी करताना म्हणजेच क्षमतेनुसार कामगिरी करताना दिसून येत नाहीत. म्हणूनच नीरज चोप्रा याने टोकिओ ऑलिम्पिकमध्ये भालाफेकीत (जॉव्हेलिन) सुवर्णपदक जिंकल्यानंतर देशात दिवाळी साजरी झाली. स्वातंत्र्यानंतर ॲथलेटिक्समध्ये भारताला मिळालेले हे पहिले सुवर्णपदक होते. यापूर्वी देशवासीयांनी मिल्खा सिंग, पी. टी. उषा यांचे हुकलेले पदकी पाहिले. हे खेळाडू अगदी किरकोळ अंतर मागे राहिल्याने त्यांना पदकापासून वंचित राहावे लागले.

मागील ऑलिम्पिकमध्ये भारताने एक सुवर्ण आणि दोन रौप्य पदकांसह एकूण सात पदके जिंकली. त्यामुळे भारतीयांत आनंदाचे वातावरण निर्माण झाले. परंतु १४० कोटी लोकसंख्या असलेल्या देशवासीयांनी अशा प्रकारच्या कामगिरीवर समाधानी राहणे कितपत योग्य? अर्थात भारतीय खेळाडूंचे धोरण आखणाऱ्या मंडळींनी ऑलिम्पिकमध्ये पहिल्या दहामध्ये सामील होण्याचे ध्येय निश्चित केले पाहिजे. पण यासाठी खूप मेहनत घ्यावी लागणार नाही. भारत जर दहा सुवर्णपदकांसह तीन डझन पदके जिंकण्याचे ध्येय ठेवत असेल तर ते साध्य करणे सहज शक्य आहे. भारतीय नेमबाज, कुस्तीपटू, मल्ल यांनी आपल्या क्षमतेनुसार कामगिरी केली तर हे लक्ष्य गाठणे फारसे अवघड जाणार नाही. भारत सरकारकडून त्यांना पुरेशा सोयी-सुविधा दिल्या जात आहेत. अशा स्थितीत पदकाची अपेक्षा ठेवली तर गैर नाही.

भारताला क्रीडा विश्वात आजवर उत्तुंग भरारी घेता न येण्यामागचे कारण म्हणजे आपल्याकडे सर्वंकष क्रीडा संस्कृतीचा अभाव. काही वर्षांपूर्वी ठराविक भागातच क्रीडा संस्कृतीला चालना मिळत असे. त्यामुळे अनेक प्रतिभावान खेळाडू मर्यादित प्रमाणात कामगिरी करत असत. मात्र २००० च्या दशकानंतर बदल होताना दिसत आहे. वास्तविक आपल्याकडे शाळा आणि महाविद्यालयाच्या पातळीवर खेळांना प्रोत्साहन दिले जाते. मात्र या स्तरावर चमकदार कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना पुढे प्रोत्साहन देण्यासाठी पुरेशी व्यवस्था तयार केलेली नव्हती. आता काही वर्षांपासून 'खेलो इंडिया'सारख्या योजनेच्या माध्यमातून दुर्गम भागातील गुणी खेळाडूंना पुढे आणले जात आहे.

या खेळात दमदार कामगिरी करणाऱ्या एक हजार खेळाडूंना दरवर्षी पाच लाख रुपये देण्याची व्यवस्था सरकारकडून करण्यात आली आहे.

# ‘त्या’ समितीत कोण आहे पाहा मग कळेलच अहवाल कसा असेल ते!

भारताच्या राज्यघटनेत ‘प्रजासत्ताक’ आणि ‘लोकशाही’ या दोन्ही संकल्पनांचे संतुलन साधले आहे. ‘प्रजासत्ताक’ ही संकल्पना भारतात ‘स्टेट’ ऊर्फ ‘शासनसत्ता’ म्हणून मानली गेली आहे, तर ‘लोकशाही’ ही संज्ञा-संकल्पना ‘सरकार’ ऊर्फ दैनंदिन कारभार चालविणारी व्यवस्था अशा अर्थाने स्वीकारली गेली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी राज्यघटनेचा सुधारित मसुदा ४ नोव्हेंबर १९४८ रोजी घटना परिषदेला सादर केला. त्यावेळी ते म्हणाले होते की की, राज्यघटनेच्या मसुद्यात ‘संसदीय लोकशाही’ प्रणालीची शिफारस केली आहे. ही शिफारस करताना ‘स्थिरता’ (डींरलळश्रळींू) व ‘सुरक्षितता’ यांच्यापेक्षा ‘जबाबदारपणा/उत्तरदायित्व’ (ठशीिेपीळलळश्रळींू/ -लर्लेीपींरलळश्रळींू) याचा विशेष प्रामुख्याने अंतर्भाव ‘राज्यपद्धती’त व्हावा अशी दक्षता घेण्यात आली आहे.’’ (थोडक्यात ‘निरंकुश’ सत्ताकेंद्राला संसदीय लोकशाहीत स्थान नाही!) माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या अध्यक्षतेखाली, देशात सर्व निवडणुका एकत्र घेण्यासंदर्भात नियुक्त केलेल्या उच्चस्तरीय समितीने राज्यघटनेचे एक प्रमुख शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे वरील मत विचारात घेणे गरजेचे आहे. जरी ते अध्यक्षीय आणि संसदीय लोकशाहीचा ऊहापोह करणारे असले तरी! ‘एक देश एक निवडणूक’ या तंत्रामुळे एकंदरच भारतातील लोकशाही फक्त कालबद्ध निवडणूक कार्यक्रम राबविणारी एक व्यवस्था ठरेल.

‘देशात सदा सर्वकाळ निवडणुकांचे वातावरण असते!’ हा यासंदर्भात केला जाणारा दावा फसवा आहे! देशव्यापी ‘लोकसभा’ निवडणूक सोडल्यास, आपल्यापासून दूरच्या उत्तर प्रदेश किंवा केरळ येथील विधानसभा निवडणुकीच्या वातावरणाचा महाराष्ट्रावर कुठे परिणाम होतो? हीच गोष्ट, दूर कुठे विदर्भातील किंवा पश्चिम महाराष्ट्रातील एका जिल्ह्यात होणाऱ्या जिल्हा परिषद किंवा पंचायत समितीच्या निवडणुकीचा कुठे मुंबई महानगराच्या दैनंदिन व्यवहारावर परिणाम होतो?

चर्चेत तरी असते का?

‘सदा सर्वकाळ निवडणुकांचे वातावरण असते!’, या न्यायाने ग्रामपंचायत ते संसद (व्हाया पंचायत समिती, जिल्हा परिषद, नगरपालिका, महानगरपालिका, विधानसभा) निवडणुका पण एकत्र घेणार का? ‘संघराज्य’ व्यवस्थेचे गमक विद्यमान केंद्र सरकारला समजले नाही की ‘संघराज्य’ व्यवस्था आणि भारतीय ‘प्रजासत्ताक’ मोडीत काढण्याचा हा प्रयत्न आहे? ‘संसद’-‘विधीमंडळ’ या घटनात्मक व्यवस्था, लोकनियुक्त सरकारवर-शासनावर नियंत्रण ठेवण्यात कितपत यशस्वी ठरल्या, यावर ‘संसदीय लोकशाही’चे यश अवलंबून आहे.

संसद-विधीमंडळातील सदस्य प्रत्येक दिवशी प्रश्न विचारून, ठराव मांडून, अविश्वासाचा ठराव मांडून, सभागृह तहकुबीचे ठराव मांडून वगैरे प्रकारांनी सरकार-शासनावर नियंत्रण ठेवण्याचे काम करत असतात. इथे सरकारचे-शासनाचे ‘लोकां’प्रति ‘उत्तरदायित्व’-‘जबाबदार’ असणे दिसून येते!

सरकार ‘लोकमता’ला जबाबदार पाहिजे, लोकांना दर पाच वर्षांनी फक्त ‘मतदाना’ला बोलावण्या पुरते नाही!

नियत में खोट है!

‘एक देश एक निवडणूक’ शक्यतेची चाचपणी करण्यासाठी नेमलेल्या समितीत माजी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांचा समावेश आहे. ते कितपत ‘स्वयंभू’ आहेत? लोकसभेचे माजी महासचिव सुभाष कश्यप यांचाही या समितीत समावेश आहे. त्यांच्या यांच्या मनात तर पूर्वीपासूनच, ‘राज्यघटने’विषयी ‘पूर्वग्रह’ ठासून भरले आहेत. अटलबिहारी वाजपेयी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी सरकारने, २००० सालच्या फेब्रुवारीत राज्यघटनेचे पुनरावलोकन करण्यासाठी सर्वोच्च न्यायालयाचे निवृत्त मुख्य न्यायाधीश एम.एन. वेंकटचलय्या यांच्या अध्यक्षतेखाली ११ सदस्यांचा राष्ट्रीय आयोग नेमला होता. त्या आयोगाचे सुभाष कश्यप हे सदस्य होते. राज्यघटना पुनर्विलोकन आयोगाने सादर केलेल्या अहवालात सुभाष कश्यप यांची भिन्न मत व्यक्त करणारी टिप्पणी आढळते.

रिपोर्ट ऑफ द नॅशनल कमिशन टू रिव्ह्यू द वर्किंग ऑफ द कॉन्स्टिट्यूशन, २००२, (पृ. २५७ ते २६६) या अहवालातील दहाव्या प्रकरणात सामाजिक आर्थिक बदलाची गती आणि विकास या विषयाच्या संदर्भात अनुसूचित जाती-जमाती, अन्य मागासवर्गीय, अल्पसंख्यांक आणि महिला यांच्या व्यापक सामाजिक हिताविषयीच्या शिफारशी आढळतात. त्या राष्ट्रीय तसेच आणि सामाजिक ऐक्याला आणि समाजाच्या बांधणीला हानिकारक ठरतील असा सुभाष कश्यप यांनी इशारा दिला आहे. आयोगाच्या शिफारशी स्वीकारल्या गेल्या तर आर्थिक विकासाच्या मुळावरच घाव घातला जाईल असे त्यांचे म्हणणे होते.

राज्यघटना पुनर्विलोकन आयोगाचा एक सदस्य काही शिफारशींबाबत ‘हातचे राखून’ बोलत असल्यामुळे त्यांना अंतिम अहवालात स्थान मिळाले नाही असा आरोपही सुभाष कश्यप यांनी सदस्याचे नाव न घेता ‘टिप्पणी’त केलेला आढळतो. (सुभाष कश्यप यांनी इंग्रजी टिप्पणी’त ‘रिझर्व्हेशन’ असा शब्द वापरला आहे! त्याचे दोन अर्थ होतात १) राखीव जागा २) हातचे राखून बोलणे. हा शब्द चलाखीने वापरून सुभाष कश्यप यांनी आडवळणाने त्या सदस्याची जात सूचित केली असल्याची शक्यता नाकारता येत नाही.)

१९९२ साली, सुभाष कश्यप यांनी राज्यघटनेत सुधारणा करण्याविषयीच्या एका पुस्तकाचे संपादन केले होते. या पुस्तकाच्या प्रस्तावनेत त्यांनी राज्यघटनेत कोणत्या सुधारणा कराव्यात याबद्दलच्या सूचना करताना आरक्षणासंबंधी खालील मते व्यक्त केली आहेत.

# देशात परीवर्तनाचे वारे केंद्रात इंडीया तर राज्यात महाविकास आघाडीचे सक्षम सरकार येणार -माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख

लातूर ( प्रतिनिधी): -संपूर्ण देशात सदया परीवर्तनाचे वारे वाहत असून आगामी काळात देशात इंडीयाचे तर राज्यात महाविकास आघाडीचे सक्षम सरकार आस्तीवात येईल असा विश्वास राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर येथे भारत जोडो यात्रा वर्षपूर्तीनिमित्ताने आयोजित पदयात्रेच्या समारोप कार्यक्रमात बोलतांना व्यक्त केला.

अखिल भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे नेते खा. राहुल गांधी यांच्याकडून काढण्यात आलेल्या भारत जोडो यात्रेच्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून लातूर शहर जिल्हा काँग्रेस व जिल्हा काँग्रेस कमिटीच्या संयुक्त विदयमाने गुरुवार दि. ७ सप्टेंबर २०२३ रोजी लातूर शहरात भव्य अशी पदयात्रा काढण्यात आली.



भारत जोडो यात्रेमूळे
काँग्रेस पक्षात नवचैतन्य

या प्रसंगी पूढे बोलतांना राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण, सांस्कृतिक कार्यमंत्री व लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री आमदार अमित विलासराव देशमुख म्हणाले की, काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहूलजी गांधी यांनी देशातील एकाधिकारशाहीच्या विरोधात देशभरात भारत जोडो यांत्रा काढली १२ राज्ये २ केंद्रशासीत प्रदेशात मिळून ४ हजार किमी पायी चालून खासदार राहूल गांधी यांनी जनतेच्या मनात काँग्रेस पक्षा बददल आपूलकी निर्माण केली आहे. त्यांच्या या यात्रेमूळे पक्षात नवचैतन्य निर्माण झाले आहे.

काँग्रेस पक्षाचे नेते खासदार राहूल गांधी यांच्या पूढाकारातून देशात विविध राजकीय पक्षाची मिळून इंडीया आघाडी तयार झाली आहे. भारतीय जनता पक्षाच्या एकाधिकारशाहीमुळे देशात महागाई, बेरोजगारी, मोठया प्रमाणात वाढली आहे विव्देषाच्या राजकारणामूळे सर्वत्र अराजकताची स्थिती निर्माण झाली आहे. या परिस्थितीत इंडीया आघाडीकडून जनतेला हवा असलेला समर्थ पर्याय मिळाला आहे. केंद्र आणि राज्यात बेंबंदशाहीला कंटाळलेल्या जनतेला इंडीया हा विश्वासार्ह पर्याय मिळाला आहे. त्यामुळे आगामी काळात केंद्रात इंडीया आघाडीचे तर राज्यात महाविकास आघाडीचे सरकार आस्तीत्वात येणार हे निश्चीत झाले आहे.

लातूर लोकसभेची जागा
इंडीया आघाडी जिंकणार

राज्यात आणि देशात सत्ता परीवर्रतन घडत असतांना लातूरला त्यात मागे राहून चालणार नाही. यावेळी लातूर लोकसभा मतदार संघात काँग्रेस म्हणजे इंडीया आघाडीचा आणि जिल्हयातील सहाही विधानसभा मतदारसंघात महाविकास आघाडीचे उमेदवार विजयी व्हायला हवेत या दृष्टीने आज पासून सर्व पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी कामाला लागावे असे आवाहन आमदार देशमुख यांनी यावेळी केले.

मराठा समाजाच्या आंदोलनाला
काँग्रेस पक्षाचा पाठींबा

जालना जिल्हयात मराठा समाजाच्या आंदोलकावर पोलीसानी केलेल्या लाठी हल्ल्याचा आमदार देशमुख यांनी यावेळी तीव्र शब्दात निषेध केला. मराठा समाज आणि मनोज जरांगे पाटील यांनी आरक्षणाच्या मागणीसाठी चालू केलेल्या उपोषणाला पक्षाच्या वतीने जाहीर पाठींबा त्यांनी यावेळी जाहीर केला. विदयमान स्थितीत ओबीसी व इतर घटकांच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला त्वरीत आरक्षण देण्यासाठी केंद्र आणि राज्यशासनाने कार्यवाही करावी अशी मागणी आमदार देशमुख यांनी यावेळी केली.

देशातील लोकशाही आणि राज्यघटना वाचवायची असेल तर सत्तेत परीवर्तन आवश्यक असल्याचे नमूद करून जनतेने भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी दिलेल्या मतदानरूपी अधिकाराचा यासाठी वापर करावा असे आवाहन प्रदेश काँग्रेसचे सरचिटणीस अशोकराव पाटील निलंगेकर यांनी यावेळी केले. यावेळी प्रदेश काँग्रेस सचिव अभय सांळूके, जळकोटचे उपनगराध्यक्ष मन्मथआप्पा किडे, उदगीर काँग्रेसचे अध्यक्ष कल्याण पाटील, चक्रधर शेळके यांनी मनोगत व्यक्त केले.

यावेळी व्यासपाठावर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष श्रीशैल उटगे, लातूर शहर जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष ड. किरण जाधव, दिपक सुळ, स्मीता खानापूरे, समद पटेल, सुनीता आरळीकर, स्वाती जाधव, सपना किसवे, मारूती पांडे, सुभाष घोडके, गणेश एसआर देशमुख, हकीमभाई शेख आदी उपस्थित होते.

सदरील पदयात्रा शहरातील राष्ट्रपिता महात्मा गांधी चौक येथून निघून हनुमान चौक, गंजगोलाई, साहित्य सम्राट अण्णा भाऊ साठे चौक या मुख्य रस्त्याने मार्गक्रमण करीत शेवटी राजर्षी छत्रपती शाहू महाराज चौक या ठिकाणी जाहीर सभेने पदयात्रेचा समारोप करण्यात आला. पावसाची संततधार सुरू असतांनाही पदयात्रेत काँग्रेस कार्यकर्ते मोठया संख्येने सहभागी झाले होते. हातात नेत्याचे फलक घेतलेले कार्यकर्ते उत्स्फुर्तपणे घोषणा देत होते. जुडेगा भारत जितेगा इंडीया, नही चलेगी तानाशाही नही चलेगी, गो बॅक गो बॅक मोदी शहा गो बॅक या घोषणांनी लातूर शहर दुमदूमून गेले होते.

यावेळी केशरबाई महापूरे, शितल फुटाणे, प्रविण पाटील, इब्रान सय्यद, प्रविण सुर्यवंशी, प्रविण कांबळे, सुलेखा कारेपूरकर, शितल मोरे, पृथ्वीराज सिरसाट, इश्वर चांडक, पवन गायकवाड, अनिल चव्हाण, ड. फारूख शेख, विकास कांबळे, जयदेव मोहिते, यशपाल कांबळे, दिप्ती खंडागळे, युनुस मोमीन, अविनाश बटटेवार, दगडूअप्पा मिटकरी, ज्ञानेश्वर सागावे, इसरार पठाण, रणधीर सुरवसे, कांवळे यांच्यासह लातूर शहर व जिल्ह्यातील काँग्रेस पक्षाच्या विविध सेलचे पदाधिकारी, कार्यकर्ते, जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपरिषद, महानगरपालिका तसेच इतर सर्व स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्थांचे आजी माजी पदाधिकारी तसेच नागरिक, महिला भगिनी या पदयात्रेत हजारोंच्या संख्येने सहभागी झाले होते.

# देशाचे नाव व राजकारण...

देशातील राज्यकर्ते नागरिकांना मूर्ख समजून नको त्या विषयांवर राजकारण करून मुख्य मुद्यावरुन लक्ष विचलित करत आहेत. सर्व सामान्य लोकांचे प्रश्न, समस्या, अडचणी व त्यावरील उपाय यासाठी कोणताही राजकीय पक्ष ठामपणे भुमिका घेताना दिसत नाही. आपल्या देशात रंग, जात, धर्म यावरून वातावरण दुषीत करून दोन गटात, समुहात, धर्मात तेढ निर्माण करून त्या मुद्यांवर नेहमी चर्चा घडवून आणल्या जातात. अशा मुद्यांवर चर्चा घडवून आणुन लोकांना जात, धर्म व समुदाय धोक्यात आहे, म्हणून ते कट्टरतेकडे वळून मुळ समस्येवर उपाय शोधुच नाही म्हणून नको त्या मुद्याला गरम करून चर्चा केली जाते. लव जिहाद, हिंदु मुस्लिम, गोमांस असे विषय उकरून काढून दोन धर्मांमध्ये वाद पेटवले जातात, जातीची घाण डोक्यात टाकुन अशा मुर्ख लोकांना महापुरूषांचे विचार व जयंतीला विरोध करायला लावला जातो, आरक्षणा बद्दल चुकिची व दिशाभूल करणारी माहिती देऊन दोन गटात वाद निर्माण केला जातो. मग लोकांसमोर प्रश्न पडतो आपल्या जाती धर्मावर अन्याय होत आहे भारत जाती प्रधान असल्याने प्रत्येकाला जात महत्वाची आहे खोलवर बिंबवले आहे परंतु खरंच हिंदु मुस्लिम वाद होणार नाहीत, जातीची घाण डोक्यात असलेल्या लोकांची महापुरुषांचे विचार व जयंती याला विरोध करण्याची हिंमत होणार नाही, आरक्षणा बद्दल प्रश्न उपस्थित राहणार नाही यावर कोणत्याही प्रकारच्या कायम स्वरुपी उपाययोजना केल्या जात नाहीत. नागरिकांनी मुळ समस्येवर बोलुच नाही किंवा त्याकडे लक्षच जाऊ नाही म्हणून मात्र खुप काळजी घेतली जाते. देशात लोकांच्या विरोधात, संविधान विरोधी अनेक कृत्य घडवून आणले जातात, तरीही लोकांना त्यांची जाणीव नाही कारण लोक सामाजिक समस्या व भारतीय संविधान या बद्दल जागृत नाहीत. प्रत्येक घरात सुशिक्षित व्यक्ती आहे परंतु घराघरात संविधान नाही. म्हणजे संविधानामुळे शिक्षण, आरक्षण, नोकरी, हक्क अधिकार, मानवी स्वातंत्र्याची फळे चाखताना आनंद वाटतो परंतु संविधान आणि संविधान निर्माते बोधिसत्व डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार व फोटो घरात आणायची आजही लाज वाटते. ही देशासाठी लाजीरवाणी बाब आहे. हक्क अधिकार व संविधानाने दिलेले स्वातंत्र्य घेताना जो स्वाभिमान आणि वरचा आवाज आहे तोच आवाज संविधान वाचण्यासाठी, समजून घेण्यासाठी आणि संविधाना विषयी बोलण्यासाठी हिंमत होत नाही हे केवळ जाती मुळेच. देशाचे संविधान लिहणाऱ्या महापुरुषांची जात बघून संविधान वाचल्या जात नसेल तर अशा लोकांना नेमकं काय म्हणावे? संविधान लोकांचे हक्क अधिकार या बद्दल कोणताही राजकीय पक्ष, सरकार जागृती करत नाही. दोन समुहात एकोपा निर्माण होईल जातीवाद, जातीय, धार्मिक द्वेष कमी होईल यासाठी चर्चा घडवून आणली जात नाही. सुशिक्षित समजणाऱ्या देशात संविधान वाचण्याची लाज व जातीभेद करण्यासाठी माज वाटतो अशा लोकांना काय म्हणावं? लोकांना अज्ञानी ठेऊन गुलाम बनवून सत्ता प्रस्थापित करून केवळ द्वेषाचे व निरर्थक राजकारण केले जाते. रोजगार, शिक्षण, आरोग्य, महागाई, महिला अत्याचार, सामाजिक न्याय याबद्दल कोणीही मजबूत भुमिका घेताना दिसत नाही. सध्या देशात नावाविषयी राजकारण तापवले जात आहे. भारतीय संविधानाचे कलम क्रमांक एक यामध्ये स्पष्ट देशाचे नाव लिहले आहे खपवळर ढहरीं ळी इहरीरीं, इंडिया अर्थात भारत. म्हणजे देशाला भारत किंवा इंडिया याच नावाने संबोधले पाहिजे. सध्या देशांतर्गत भारत सरकार या नावाखाली व्यवहार चालतो, प्रादेशिक भाषेमधुन भारत सरकार असेच लिहले बोलले जाते. जेव्हा इंग्रजी भाषेचा वापर केला जातो किंवा परराष्ट्रीय व्यवहार केले जातात तेव्हा मात्र इंडिया चा वापर केला जातो. देशातील नागरिक व सरकार दोन्ही नावाचा वापर करू शकतात त्यासाठी त्यांच्या वर कोणतेही बंधने नाहीत. तरीही देशाच्या नावावर राजकारण करून राजकारणी लोक निव्वळ टाईमपास करून जनतेची दिशाभूल करत आहेत. उगवलेला प्रत्येक दिवस हा फक्त राजकारणी लोकांच्या फायद्याचा आहे लोकांसाठी अच्छे दिन तर एक स्वप्नच आहे. सरकारने इंडिया नावाऐवजी भारत हा वापरला म्हणून काही विरोधक विरोधात गेले. इंडियाच शब्द वापरायला पाहिजे असा हट्ट धरत आहेत. तर सरकार इंडिया शब्द गुलामी दाखवते म्हणून भारत शब्दच वापरणे योग्य असल्याचे सांगत आहे. मुळात घटनेच्या कलम क्रमांक एक देशाचे दोन्ही नाव दिलेले आहे म्हणून यावर राजकारण नकोच होते पण त्याला राजकारणाचा मुद्दा बनवला. सरकार आज म्हणते इंडिया शब्द गुलामी दर्शक आहे म्हणून भारत वापरा. पण मेक ईन इंडिया, स्टँड अप इंडिया, स्टार्टअप इंडिया, शायनिंग इंडिया या नावाने गाजावाजा करताना सरकार ला ह्याचे भान नव्हते का? इंग्रजी भाषेतील व्यवहार व परराष्ट्रीय व्यवहार इंडिया शब्द वापरून केला जातो मग त्या ऐवजी भारत शब्द वापरायचा तर सर्वांना विश्वासात घेऊन सरकारने चर्चा करायला पाहिजे कोणतीही मनमानी करायला देश कोणाची खाजगी संपत्ती नाही. आणि विरोधकांनी विरोध करायचा ह्याचे थोडे गांभीर्य पाहिजे. देशातील सार्वजनिक मालमत्ता विकल्या जात आहेत, ईव्हीएम मध्ये घोटाळा करून सरकार बनत आहेत, भ्रष्टाचार व बलात्काराचे आरोप असलेल्या लोकांना मंत्रीपद दिल्या जात आहेत तेव्हा कोणीच विरोध करत नाहीत. लाखो करोडोचा निधी जनकल्याणासाठी येतो परंतु तो खर्च होतो की यावर कधीच कोणी बोलत नाही. म्हणजे संसद आणि राज्य विधिमंडळ केवळ खासदार आणि आमदार यांच्या वैयक्तिक लाभासाठी बनवले गेले आहे का? जनतेच्या हिताचे सर्वांगीण बाजु मांडणारा नेता किंवा राजकीय पक्ष शिकल्लच राहीला नाही. देशात जनता राजा आहे आणि राज्याचेच हाल सेवकाकडून होत आहेत. याला च नितीमत्ता म्हणायचे का? विरोधक भारत देशाच्या नावासाठी न्यायालयात गेले भारत नाही तर इंडिया म्हणायला पाहिजे. अशा विरोधकांना एवढेही कळू नाही की भारत आणि इंडिया दोन्ही शब्द घटनेमध्ये नमुद आहेत म्हणजे दोन्ही शब्द वापरू शकतो. जेव्हा देशाला भारत आणि इंडिया या व्यतीरीक्त हिंदुस्थान म्हणून हेच विरोधक बोलतात तर हिंदुस्थान हा संविधानीक शब्द आहे का? भारत किंवा इंडिया नावाऐवजी हिंदुस्थान शब्द वापरला जातो आणि हे घटना बाह्य आहे यावर विरोकांनी न्यायालयात जायला पाहिजे पण का गेले नाही? याचाच अर्थ राजकीय लोक कोणत्याही मुद्यावर राजकारण करून जनतेची दिशाभूल करत आहेत. आणि जनतेच्या हक्क अधिकार व न्यायाविषयी कोणीच बोलत नाही किंवा शेवटपर्यंत बाजु उचलून धरत नाहीत. सरकार आणि विरोधी पक्ष व नेते दोन्ही ही जनतेच्या विरोधात च काम करत आहेत. जनता महागाई ने होरपळून निघत आहे, तरुण बेरोजगार आहेत, शिक्षणाचे खाजगीकरण करून शिक्षणाचा बाजार केला त्यामुळे सर्वसामान्य लोकांना शिक्षणाची फी परवडणारी नाही आहे. अशा समस्या लोकांच्या असताना यावर चर्चा घडवून न आणता प्रेमप्रकरणा वरुन हिंदु मुस्लिम वाद, जयंती वरून मराठा बौद्ध वाद, आरक्षणा वरुन मराठा ओबीसी वाद पेटवून देतात आणि गुपचूप आमदार खासदारांचे पगार वाढवले जातात. मतदार संघात मंजूर झालेला निधी गायब होतो आणि लाखो रुपयांचे पगार पाहिजे, वरूण पेंन्शनही पाहिजे. एवढ्यावरच हे थांबत नाहीत तर दाढी कटींग साठी यांना वेगळे पैसे पाहिजे, मोफत जेवण्याची फिरण्याची सुविधा पाहिजे, लाखो करोडोचे घर पाहिजे, आलीशान गाड्या पाहिजे, जनतेला मात्र यापैकी काहीच दिले जात नाही. जनतेला फक्त जात धर्म आणि द्वेषावर लढवले जाते आणि त्याचाच वापर पुन्हा राजकीय लोक राजकारण करण्यासाठी करतात. हि भुमिका आणि मानसिकता जोपर्यंत सर्व सामान्य जनता ओळखणार नाही तोपर्यंत शुल्लक कारणावर राजकारण केले जाईल आणि जनतेचे महत्त्वाचे मुद्दे दुर्लक्षित करून समस्या वाढवल्या जातील. राज्यकर्त्यांना वठणीवर आणण्यासाठी सर्वांनी मिळून ईव्हीएम ला विरोध करून बॅलटपेपर वर निवडून घेण्याची मागणी करणे आवश्यक आहे. कारण ईव्हीएम च्या माध्यमातून लोकांच्या मताची किंमत शुन्य केली, लोकांच्या मताची गरज त्यांना नसल्याने ते लोकांच्या हिताचे प्रश्न व मुद्दे यावरच बोलतच नाहीत. राजकारणी लोक वैयक्तिक फायदा करून जनतेमध्ये तेढ निर्माण होईल असे मुद्दे हाताळत आहेत. हे थांबण्यासाठी निवडणूक बॅलटपेपर घेणे आवश्यक आहे तरच जन हिताचे प्रश्न व समस्या सोडविल्या जातील व निरर्थक राजकारण थांबायला सुरवात होईल.

-----------------------

विनोद पंजाबराव सदावर्ते
समाज एकता अभियान
रा. आरेगांव ता मेहकर
मोबा: ९१३०९७९३००

# आ रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते यशवंतवाडी येथील ५५ लाख खर्चाच्या विकास कामाचा भूमिपूजन आणि लोकार्पण

लातूर – रेणापूर तालुक्यातील मौजे यशवंतवाडी येथील ५५ लक्ष रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचा भूमिपूजन आणि लोकार्पण सोहळा भाजपाचे नेते आ रमेशआप्पा कराड यांच्या शुभहस्ते ६ सप्टेंबर बुधवार रोजी संपन्न झाला. मोठ्या उत्साहाच्या वातावरणात झालेल्या या कार्यक्रमास ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

मौजे यशवंतवाडी येथील वीस लाख रुपयाचे अंतर्गत सिमेंट रस्ता, दहा लाख रुपयाचा पेवर ब्लॉक रस्ता, दहा लाख रुपयाचे सभामंडप, आठ लाखाचे शाळेतील स्वच्छालय पाच लाख रुपये खर्चाचे जल जीवन मिशन अंतर्गत नवीन बोर व पाईपलाईन आणि दोन लाख रुपयांचे नाली बांधकाम अशा एकूण ५५ लाख रुपये खर्चाच्या विविध विकास कामाचा लोकार्पण आणि भूमिपूजन भाजपाचे नेते




आ रमेशअप्पा कराड यांच्या शुभहस्ते झाले यावेळी विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे संगायो समितीचे अध्यक्ष वसंत करमोडे भाजपाचे महेंद्र गोडभरले रमाकांत फुलारी सिद्धेश्वर मामडगे सुरेश बुड्डे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

यशवंत वाडी येथील ग्रामस्थांशी संवाद साधताना आ रमेशआप्पा कराड यांनी गावच्या विकासासाठी निधीची कमतरता भासणार नाही अशी ग्वाही दिली मोठ्या उत्साहाच्या वातावरणात झालेल्या या भूमिपूजन व लोकार्पण सोहळ्यास सरपंच ओम चव्हाण, उपसरपंच सौ मीरा सूर्यवंशी, ग्रामपंचायत सदस्य प्रभाकर चव्हाण, सुनीता सूर्यवंशी, तंटामुक्ती अध्यक्ष वसंतराव सूर्यवंशी, ओमकार शिरसागर, धोंडीराम ठोंबरे, राजू काळे, सुलोचना सुगावकर, कोंडीबा जाधव, केशव मोरे, भिकाजी चव्हाण, गणपत चव्हाण, भाऊसाहेब चव्हाण, प्रभाकर सूर्यवंशी, दिलीप सूर्यवंशी,नारायण सूर्यवंशी, बाळासाहेब सूर्यवंशी, शंकर मोरे,अर्जुन सूर्यवंशी व समस्त गावकरी उपस्थित होते

# राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या लातूर शहर जिल्हा अध्यक्ष पदी लालाभाऊ सुरवसे यांची नियुक्ती




लातूर :– राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या लातूर शहर जिल्हा अध्यक्ष पदी लालाभाऊ सुरवसे यांची नियुक्ती.महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजितदादा पवार,महाराष्ट्राचे वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांच्या हस्ते नियुक्तीपत्र देण्यात आले.

यावेळी कॅबिनेट मंत्री अनिल पाटील,राष्ट्रवादी युवक काँग्रेस चे प्रदेशाध्यक्ष सुरजदादा चव्हाण शिक्षक आमदार विक्रम काळे व प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते.

लाला भाऊ सुरवसे यांच्या निवडीचे महाराष्ट्र राज्य क्रिडा, व युवक कल्याण मंत्री संजयजी बनसोडे ,आ.बाबासाहेब पाटील,शहर जिल्हाध्यक्ष मकरंदभैय्या सावे,माजी नगराध्यक्ष अफसर शेख,शहर कार्याध्यक्ष प्रशांत पाटील,जेष्ठ नेते ऍड. व्यंकट ब्रेंदे,मुर्तुजा खान,माजी महापौर अख्तर मिस्त्री,माजी नगरसेवक नवनाथ आल्टे यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या लातूर शहरातील पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी निवडीचे स्वागत केले आहे.

# बुद्ध विहार हे कुणाच्या मालकीचे नसून ते सामाजिक चळवळीचे केंद्र आहे..!- डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर

**गाव तिथ भारतीय बौद्ध महासभा शाखा जिथ शाखा तिथ वंचित बहुजन अघाडीची शाखा ओपन करा..! २०२४ ची निवडणूक हि फुले, शाहू, आंबेडकरांना मानणाऱ्यां लोकांसाठी आती महत्वाची आणि आपले अस्थित्व सिद्ध करण्याची हि निवडणूक आहे; बुद्ध विहारात धम्मकारणा बरोबर राजकारणाचे परिसंवाद झाले तरच आपले संविधान सुरक्षित राहील..!– डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर**

नवी मुंबई / के. एच. हनवते :– नुकतेच नवी मुंबई येथे दि. बुद्धीस्ट सोसायटी ऑफ इंडीया अर्थात भारतीय बौद्ध महासभा नवी मुंबई जिल्ह्याच्या वतीने २६ वा वर्धापन दिन कोपर खैरणे नवी मुंबई येथे जल्लोशात साजरा करण्यात अला त्यावेळी या कार्यक्रमास प्रमुख मार्गदर्शक भारतीय बौद्ध महासभा – कार्याध्यक्ष – समता सैनिकदल अध्यक्ष – डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर यांनी वरिल उदगार काडले ते आसेही म्हणाले की भारतीय बौद्ध महासभा हि संस्था आयरे गैरें नथुखैरेंची संस्था नसून ति महामानव बौद्धीसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची संस्था आहे. आणि त्या संस्थेचा आपन नवी मुंबई जिल्हा कमिटी तर्फे भारतीय बौद्ध महासभेचा २६ वा वर्धापन दिन शेतकरी समाज हाल कोपर खैरणे, नवी मुंबई येथे साजरा करीत अहात त्याबद्दल आपल्या सर्वांचे मनःपुर्वक अभिनंदन करतो. आसे उदगार काढून सर्वांमधे उत्साह आणि जोशपूर्ण मार्गदर्शन केले. हा कार्यक्रम नवी मुंबई येथे भारतीय बौध्द महासभेचा पहिल्यांदाच २६ वा वर्धापन दिन जल्लोशात साजरा होतो आहे त्यावेळी मार्गदर्शन करताना भिमराव आंबेडकर आसेही म्हणालेकी फुले, शाहू, आंबेडकर विचारधारी ८५ % वंचित बहुजन समाजासाठी २०२४ ची हि निवडणुक आपल्या आस्तित्वाची व संविधानाचे संरक्षण करण्याची व लोकतंत्र जिवंत ठेवण्याची हिच खरी वेळ आहे. भाजप सरकार हे या देशाला हिंदुराष्ट्र बनवण्याची तयारी करू पहात आहेत. याचे विचार मंथन होणे ही काळाची गरज आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की, ज्या धमाला राजाश्रय आसतो तोच धर्म वाढतो...आणि म्हणून राजकीय सत्ता हिच सर्व समस्याची गुरू किल्ली आहे ति हसील करा..! फक्त धम्मच करत बसाल तर तुमच्या हाती काहीच येणार नाही म्हणून जिथ भारतीय बौद्ध महासभेची शाखा तिथं वंचित बहुजन अघाडीची शाखा ओपन करा. बुद्ध विहार हे कुणाच्या मालकीचे नसून ते एक सामाजिक



चळवळीचे केंद्र आहे. त्यावेळी सर्व उपस्थितांनी टाळ्यांचा व घोषणेचा गजर केला.

अशा ऐतिहासिक क्षणी मात्र नवी मुंबईत वंचित पदाधीकारी किंचीत वंचित बहुजन अघाडी नवी मुंबईतील किंचीत पदाधीकारी उपस्थित बाकी पदाधीकारी गेले कुठे..? त्यावेळी वंचित कार्यकर्ते विष्णु वासमनी ( जिल्हासंघटक ), संजय झनके ( मा. महासचिव ), कल्याणराव हनवते ( मा. ऊपाध्यक्ष बेलापूर तालुका ), सुभाष बलखंडे ( युवा कार्यकर्ते ), अँड जानकी आनंद ( मा. महीला संघटक ) इत्यादी किंचीत कार्यकर्ते उपस्थित होते. बाकी नामधारी पदाधिकारी वाटसॅप – फेसबुक वर हिरो बाकी सब जगह झिरो. पक्षादेश येईल तेवढेच काम करायचे का ? बेलापूर तालुका कार्यकारिणी जाहीर करणार की नाही..? असा प्रश्न उपस्थित कार्यकर्त्यात दिसुन अला. अशाने नवी मुंबईत वंचित बहुजन अघाडी कशी काय वाढणार..? जे नामधारी पदाधिकारी आहेत ते कधी ऐरोलीच्या बाहेर पडत नाहीत, इतर विभागात कधी मिटींग लावतच नाहीत, जे ऐक्टीव कार्यकर्ते आहेत त्यांची कार्यकारणी का म्हणून जाहीर करत नाहीत, आसी साधक बाधक चर्चा कार्यकर्त्यात होत आहे. जे पक्षात आहे ते आजी माजी पदाधीकारी पण पक्ष सोडून जात आहेत याचा पक्षश्रेष्ठी यांनी जरूर विचार करावा व नवी मुंबई जिल्हाध्यक्ष आणि बेलापूर तालुका अध्यक्ष लवकरात लवकर जाहीर करावा. आसे आम्ही प्रसिद्धी पत्रकात जाहीर करत आहोत. त्यावेळी वंचित बहुजन आघाडी जिल्हासंघटक विष्णु वासमनी, तुर्भे वार्ड ७१ चे उपाध्यक्ष अरविंद गायकवाड, जेष्ठ कार्यकर्ते चंद्रकांत तापकिरे, आनंद पाचपिंडे, बळीराम निसर्गन इत्यादी पदाधिकारी कार्यकर्त्यांनी डॉ. भीमराव यशवंत आंबेडकर साहेब यांचा जाहीर सत्कार करण्यात आला.




भारतीय बौध्द महासभा नवी जिल्ह्याच्या वतीने २६ वा वर्धापन कोपर खैरणे नवी मुंबई येथे साजरा करण्यात अला त्यावेळी वंचित बहूजन अघाडी च्या वतीने डॉ. भिमराव यशवंत आंबेडकर यांचा जाहीर सत्कार करताना नवी मुंबईत वंचित पदाधीकारी किंचीत बाकी कार्यकर्ते गेले कुठे..?

# सुरक्षित गुंतवणूक काळाची गरज: शाखा प्रमुख जयप्रकाश धर्मे यांचे प्रतिपादन

मुरुड /महेंद्र आल्टे : समाज जागृती शिक्षण संस्था संचलित, संभाजी कॉलेज मुरुड, ता. जि. लातूर. दिनांक ०७/०९/२०२३ रोजी (वार– गुरूवार) महाविद्यालयात अर्थशास्त्र विभागाच्या वतीने सुरक्षित गुंतवणुक या विषयावर व्याख्यान संपन्न झाले. या कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून जयप्रकाश जयदेव धर्मे ( शाखा प्रमुख, स्टेट बँक ऑफ इंडिया, मुरूड ) उपस्थित होते. तर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्र.प्राचार्य डॉ. अनंत पिडगे होते. प्रमुख उपस्थिती मध्ये मा.चंद्रशेखर आल्टे होते. कार्यक्रमाची सुरूवात आलेल्या पाहुण्यांचे स्वागत




करून झाली. या व्याख्यानाच्या प्रसंगी बोलताना जयप्रकाश धर्मे यांनी सुरक्षित गुंतवणूक व गुंतवणुकीचे महत्व आणि गुंतवणुकीचे विविध मार्ग याविषयी आपले विचार मांडले. म्युच्युअल फंडात गुंतवणूक करणे चांगले आहे तसेच इन्शुरन्स, हेल्थ इन्शुरन्स देखील काढून आपण योग्य गुंतवणूक केली पाहिजे असे मत त्यांनी व्यक्त केले तर अध्यक्षीय समारोप करताना डॉ. पिडगे सरांनी गुंतवणूक काळाची गरज असल्याचे मत व्यक्त केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक व सूत्रसंचालन अर्थशास्त्र विभागातील प्रा.सुर्यवंशी.ए.व्ही. यांनी केले. तर आभार आयक्युएसीचे प्रमुख प्रा. महादेव गायकवाड यांनी मानले. याप्रसंगी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी उपस्थित होते.

# गणेशोत्सव काळात सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करावे - क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे

लातूर, दि. ७ (जिमका) : गणेशोत्सव काळात गणेशोत्सव मंडळांना आवश्यक परवानग्या तातडीने मिळण्यासाठी, तसेच या काळात कायदा व सुव्यवस्था कायम राहण्यासाठी सर्व शासकीय विभागांनी समन्वयाने काम करण्याचे आदेश क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी दिले.

उदगीर शासकीय विश्रामगृह येथे आयोजित विविध शासकीय विभागांच्या बैठकीत ना. बनसोडे बोलत होते.

माजी आमदार गोविंदराव केंद्रे, तहसीलदार रामेश्वर गोरे, उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप भागवत, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, उपविभागीय कृषि अधिकारी एन. आर. काळे, नगरपरिषदेचे मुख्याधिकारी शुभम क्यातमवार, महावितरणचे उप कार्यकारी अभियंता सायस दराडे, सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपअभियंता एल. डी. देवकर, ग्रामीणचे पोलीस निरीक्षक अरविंद पवार, शहर पोलीस निरीक्षक परमेश्वर कदम यांच्यासह विविध विभागांचे



अधिकारी यावेळी उपस्थित होते.

उदगीर शहर आणि तालुक्यात कायदा व सुव्यवस्था कायम राहण्यासाठी पोलीस प्रशासनाने आवश्यक उपाययोजना कराव्यात. तसेच उदगीर नगरपालिकेने शहरामध्ये सीसीटीव्ही कॅमरे बसवावेत. गणेशोत्सव मंडळांना आवश्यक परवानग्या देण्यासाठी महसूल पोलीस प्रशासन, नगरपरिषद, महावितरण यांनी परस्पर समन्वयाने काम करावे, असे ना. बनसोडे यावेळी म्हणाले.

नगरपरिषदेने शहरातील स्वच्छतेसाठी उपाययोजना कराव्यात. भूमिगत गटार योजनेचा प्रस्ताव लवकरात लवकर सादर करण्यासाठी सर्वेक्षण आणि इतर कामांना गती द्यावी. या प्रस्तावासाठी आवश्यक कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याल प्राधान्य द्यावे, असे ना. बनसोडे यांनी यावेळी सांगितले. तसेच नगरपरिषदेमार्फत राबविण्यात येत असलेल्या विकासकामांचा आढावा घेतला.

उदगीर तालुका क्रीडा संकुलामध्ये उपलब्ध होणार अद्ययावत क्रीडा सुविधा

उदगीर तालुका क्रीडा संकुलामध्ये खेळाडूंना मुंबई, पुण्याच्या धर्तीवर क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासाठी तयार करण्यात येत असलेल्या प्रस्तावाचा क्रीडा व युवक कल्याण मंत्री संजय बनसोडे यांनी आढावा घेतला. आंतरराष्ट्रीय, राष्ट्रीय खेळाडू घडण्यासाठी त्यांना अद्ययावत क्रीडा सुविधा उपलब्ध करून देण्यावर शासनाचा भर असल्याचे त्यांनी सांगितले.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE